# स्त्रिवादी दृष्टिकोनातून महात्मा ज्योतिबा फूले

**डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे,**
विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला
व समाजविज्ञान संस्था, नागपूर.

★★★

**प्रस्तावना :** जग एकविसाव्या शताकडेच नाही तर ज्ञानयुगाकडे वाटचाल करीत आहे. भारताने ही विज्ञान, तंत्रज्ञान, आकाशगंगा क्षेत्रात प्रगती केली असली तरी ही स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन फारसा सकारात्मक झालेला आढळत नाही. जागतिकीकरण, पश्चिमात्यीकरण, उत्तर आधुनिकीकरण प्रवाहात शिक्षणाच्या धर्तीवर पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सर्वक्षेत्रात पदार्पण केले आहे. समाजात मध्यकाळात प्रबोधन चळवळ जी सुरू झाली त्यातून स्त्रीला प्रतिष्ठा सन्मानाची वागणूक दिली पाहिजे ही विचारसरणी रूजू होऊ लागली. ज्या समाज सुधारकांनी स्त्रीयांना सन्मानाने वागावे, व्यवस्थित आयुष्य जगता यावे, याकरीता संपूर्ण आयुष्यभर श्रम घेतले, त्यातून स्त्री शिक्षणाची, स्त्री दृष्टिकोनाची चळवळ सुरू झाली. समाजातील सामाजिक सुधारणेच्या कार्याला नवी दिशा प्राप्त झाली. त्यातूनच एकविसाव्या शतकात महिला सक्षमीकरणाला बळ प्राप्त झाले. प्रस्तुत शतकातील आव्हानांना, विवचनांना, रूढीवादी दास्यातून तोंड देण्यासाठी 'स्त्रीशक्ति' उभी झाली. स्त्रिया या कमजोर, दुर्बल, निर्णयरहीत, अबला नसून सक्षम आहे. ही प्रेरणा स्त्री पुर्नस्थापना, पुनरूत्थानासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारकांनी समाजाला करून दिले. स्त्री शिक्षणाने, कतृत्वाने कुठेही कमी नाही, तरी स्त्रियांमध्ये तत्वज्ञ, समाजचिंतक, राज्यकर्त्या, साहित्यीक, मंचावर विराजमान स्थितीचे अवलोकन केले असल्यास तिचे प्रमाण कमी आहे. असे असून ही समाजाच्या मार्गदर्शनासाठी स्त्रियांनी विचार प्रस्तुत केला आणि समाजाने मान्य केला हा अनुभव कमी येतो. यासाठी पुरूषप्रधान संस्कृतीची मानसिकता, व्यवस्था, सामाजी करणाच्या प्रक्रियेत क्रांतीकारी परिवर्तन अपेक्षित आहे. कुटुंबाला, समाजाला नैतिक वळण लावण्याचे कार्य चांगल्या संस्कारातून स्त्री करू शकते. पण त्यासाठी स्त्रीचे जीवनमान, स्तर, दर्जा सुधारणे गरजेचे आहे.

हे शिक्षणाशिवाय शक्य नाही. म्हणून स्त्रियांना समानता, शिक्षण देणे गरजेचे समजून विश्वज्ञान प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरू क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फूले यांनी स्त्रि जीवनाला, कार्याला, अधिकाराला, दृष्टिकोनाला नवी दिशा दिली. ज्याप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी मतदानाचा हक्क स्त्रीला प्रदान केले, कायद्याद्वारे स्त्रीला समानतेचा अधिकार संविधानाच्या माध्यमातून प्रदान केला त्याप्रमाणे ज्योतिबा फूले यांनी स्त्री–पुरुष विशमतेला तिलांजली देऊन समानतेचे जे बीज समाजात रूजविण्याचे कार्य केले. स्त्रीला स्वतःचे कर्तृत्व, राजकीय, सामाजिक, तांत्रिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्यीक, सांस्कृतीक क्षेत्रात अतिशय संघर्ष करावा लागतो. विसाव्या शतकात जगत असतांनाही स्त्रियांवर होणरे अत्याचारात उत्तरोत्तर वाढतच आहे, रूढीवादी विचार, परंपरा, सामाजिक, निर्बंध, यातून स्त्रीला मुक्त करण्यासाठी प्रस्थापित समाज व्यवस्थेविरूध्द महात्मा ज्योतिबा फूले यांनी समाज सुधारणेचे जे कार्य हाती घेतले, त्याचा परिणाम होय. स्त्रिला दुर्बल, कमजोर, अबला मानून तिचा षारीरीक, मानसिक, शाब्दिक, आर्थिक, सांस्कृतिक रित्या तिला प्रताडित केले जायचे, जिथे स्त्रिशक्तीचा अपमान वारंवार होताना दिसायचा, स्त्री–पुरुष विशमतेचा विचार ठान मांडून होते, अशा समाजात स्त्रीच्या अस्तित्वासाठी लढा देणाऱ्या महात्मा ज्योतिबा फूले यांनी स्त्रियांच्या उत्थान, प्रगती, विकास, पुर्नरूत्थापन, पुर्नसमाजमांडणी, शिक्षणाची व्यवस्था केली. हुंडा, बालविवाह, विधवा केशवपन, बहुपत्नीक यासारख्या अनिष्ठ प्रथावर लेखणी, कृती, बंड द्वारा हल्ला चढविला. स्त्रिरक्षण, सन्मान, सक्षमीकरण व्यवस्था व सुधारण केली.

महात्मा ज्योतिबा फूले यांनी भारतातील प्रथम स्त्री शिक्षण, शिक्षण तज्ञ, स्त्री मुक्ती चळवळीची नेता, पददलितांची कैवारी, प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्ता, विधवांचा आधारस्तंभ क्रांतिज्योती सावित्रीबाई फूले यांना घडविले. त्यांचे स्त्रीविषयक कार्य स्त्रीकल्याणाच्या दृष्टिने महान आहे. सावित्रीबाई फूले च्या स्वरूपाने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात संधी प्राप्त करून देण्याचे दालन खऱ्या अर्थाने महात्मा फूले यांनी खुले केले. महात्मा फूले केवळ स्त्री नेतृत्व व महिलांच्या कल्याणासाठी झटले नव्हे तर, स्त्रियांच्या हक्कासाठी, स्त्री शिक्षणासाठी, स्त्री–पुरुष समतेचा विचार रूजविण्यासाठी विचार व कृतीच्या आधारे स्त्री पुर्नरूत्थानाचे महान कार्य केले.

ज्याप्रमाणे दक्षिणेत पेरियार रामास्वामी यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी शाळा, प्रशिक्षण केंद्र, महाविद्यालयांची स्थापना करून स्त्री शिक्षणाची गरज आहे असा दक्षिणेत प्रचार केला. एवढेच नव्हे तर त्या काळात स्त्रियांना तांत्रिक शिक्षण प्राप्त व्हावे यासाठी स्वतंत्र अभियांत्रिकी महाविद्यालय ही स्थापन केले. स्त्रीला शिक्षण, संधी दिल्यास ती पुरूशांपेक्षा कधीही मागे राहत नाही असे सूचविले तसेच महात्मा ज्योतिबा फूले यांनी पूरोगामी महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रवाह प्रवाहित केला. स्त्रियांनी सामाजिक क्रांतीत, प्रत्यक्ष परिवर्तनात, चळवळीत सहभाग केला नाही तर ती अपूर्ण राहू शकते. हे सत्य महाराष्ट्रातील कर्ता समाजसुधारकांना पटले, त्यांनी ते ओळखले. पुरुषसत्ताक, धर्मधिष्टित व्यवस्था, समाजसंरचनेच्या व्यवस्थेत भारतीय समाजात स्त्री–पुरुष विषमतेच्या व पारतांत्र्यांच्या बधिस्थः पिढयान्पिढयात

स्त्री बंदिस्तच राहिली. तिचा दर्जा, स्थान, स्थिती गौण राहिली. तिच्या वेदना, अपमान, दु:ख, विवंचनाकरीता समाजात न्याय मिळत नव्हता. स्वत:च शोषित असूनही धर्मशास्त्राच्या मंजुरीने प्रगट झालेल्या शोषणाला प्रगट करता येत नव्हते. स्त्री सर्व दु:खाकरीता नियतीमुळेच, दैवीप्रकोप, समजण्यातच आयुष्याची इतिकर्तव्यता आहे हे ती गृहित धरू लागली. परंतु या मुळाशी काही स्वार्थपरायण, अनिष्ट,सर्वला न्यायसंगत मानणारे, लोभी, धर्मपाखंडी आहेत ज्यांनी स्त्रीला तिचे हक्क, अधिकार, चेतना, मिमांसा प्रगट होण्याची संधीच निर्माण होऊ दिली नाही म्हणून तिच्या विद्याग्रहणाला प्रतिबंध घातला या शब्दात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्पष्ट केले.

**ज्योतिबांची लेखनातील स्त्रीवादी परिप्रेक्ष्य** :– ज्योतीराव फूलेंची भाषाशैली अनेक दृष्टिने उद्बोधक होती. लेखन प्रपंचावर उच्चवर्णीयांची तेव्हा मिरासदारी असूनही ज्योतिरावांनी विपुल लेखन केले. समाजातील निरक्षर, अज्ञानी, कष्टोपजीवी अशा समस्त स्त्रीया, शुद्रातिशुद्र समाज, आपला श्रोतावाचक चिंतनाविषयी समजून विविध संदर्भाने लेखन कार्य केले. शोषितांच्या मनात स्वत:च्या गुलामीची जाणीव जागवून तिच्याबद्दलची चिड त्यांच्या मनात पेरायची आणि स्त्रीयांचा अन्याय, सामाजिक अनादर स्त्रीयांचे विविध प्रश्न, स्त्रीयांवरील अत्याचार, स्त्री शिक्षण व उपदेशपर नाटके इत्यादी विषयांवर ज्योतीरावांनी विपुल लेखन कार्य केली.

समाजिक समस्यांना हात घालणारे, सामाजिक बांधिलकी सांगणारे, सर्वार्याने आधुनिक असणारे पहिले मराठी नाटक तसेच तष्तीय रत्न या नाटकाचे विष्लेशण करावे लागले. स्त्री –शुद्रातिशुद्रांना धर्माच्या नावाखाली कसे लुबाडले जाते आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक कसे त्याला ज्ञानाचा मार्ग दाखवितात हे शोषित समाजाच्या लक्षात आणून देणे हा या नाटकाचा मुख्य उद्देष्ट होता.

शिवाजीचे कर्तृव्य स्त्री–पुरूषांच्या हिताचे करणारा छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा 1869 मध्ये गावोगावी जावून मौखिक संवादात्मक लेखनशैलीचा अवलंब करून लिहिला. उच्चवर्णीयांचे स्त्री शोषणाचे प्रकार, धर्माच्या नावे उच्चवर्णीयांची भूलथाप 1869 मध्ये 'ब्राम्हणांचे कसब' या पुस्तकात प्रसिद्ध केले.

युनाइटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांना गुलामीच्या दास्यातून मुक्त करण्याच्या उद्देशाने त्यांना औहार्य, निरपेक्षता व परोपकारी दृष्टि दाखविली. उच्चवर्णीयांच्या दास्यातून मुक्त करणारा हा ग्रंथ होता. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असे 1882 मध्ये हंटर आयोगासमोर त्यांनी निवेदन केले. शिक्षण खालच्या वर्गापासून झिरपत जावे असे शैक्षणिक धोरण आखण्याचे त्यांनी इंग्रजांना आव्हान केले. शेतकऱ्यांच्या खालावलेल्या परिस्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन 1883 मध्ये 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात केले. शेतकरी वर्गाचा जीवनक्रम आणि शेतीविषयक प्रश्न यांचे इतके समग्र, सखोल आणि आस्थेवाईक चित्रण ज्योतीराव फूल्यांपूर्वी बहुतेक कोणीच केले नसावे. त्यांनी समाजाचे सामर्थ आरोग्य, लोकांच्या अन्नवस्त्राची प्राथमिक गरजांच्या परिपूर्तीवर अवलंबून असल्यामुळे आधुनिक औद्योगिक समाजाचा खरा पणा अन्नउत्पादक शेतकरी वर्गच असतो अशी समाज शास्त्रीय भूमिका मांडली. अस्पृश्यंच्या दयनीय स्थितीचे चित्र 1883 मध्ये 'अस्पृश्यांची कैफियत' या ग्रंथात केली. 1885 मध्ये 'इशारा' हा ग्रंथ लिहिला. तर नवयुगाला अनुरूप अषा नव्या धर्माची उभारणी करणे त्यांना आवष्यक वाटते. म्हणून त्यांना अभिप्रेत असलेल्या मानव कल्याण धर्माची रुपरेशा मांडली. हा ग्रंथ 'विश्व कुटुंबशहाचा सार्वजनिक सत्यधर्म' हा जाहीरनामा आहे. 1991– काव्यरचना, 1885–सत्य शोधक समाजीकता मंगललाष्ठकसह पूजाविधी, 1891 सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट 1977 दुष्काळाविषयी विनंतीपत्र कसे समाजहिताचे लेखन कार्य केले.

एकोणिसावे शतक हे पुरूषसत्ताक पद्धतीसाठी सुवर्ण युग होते. कारण त्या काळात कालविसंगत परंपरा व प्रधानाच्या प्रभावातून समाज हा मुक्त झाला नव्हता. आधुनिक शिक्षणाचा थोडाफार प्रमाणत प्रारंभ झालेला असला तरी स्त्रियांच्या यातना बंद झाल्या नव्हत्या. शिक्षणावर उच्चवर्णीय जातींची मक्तेदारी (मिरासदारी) जवळपास कायम होती. नवविचाराचे वारे थोपविण्यामध्ये परंपरावादी सशक्त होते. जनतेचा रोष होईल व आपल्या राजकारणात अडचणी निर्माण होतील. या स्वार्थी हितसंबंधासाठी शासनकर्ते, राजकर्ते, सामाजिक सुधारण घडवून आणण्यासाठी पुढाकार घेण्यात तयार नव्हते. परंपरावादी आणि सुधारणावादी यांच्यात परस्पर संघर्ष सुरु होता. अष्या प्रतिकुल परिस्थितीत महात्मा फुले यांनी स्त्री अधिकारविषयक विचार मांडले आणि ते विचार प्रत्यक्षात साकार करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यही केले.

**तात्कालीन समाजातील स्त्रियांची स्थिती** :– महात्मा फूलें ज्या चळवळीच्या कालखंडात स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. समाज संरचनेत त्यांना हिन दर्जा होता. स्त्री ही सुखाची व उपभोगाची वस्तू आहे अषी समजूत त्या काळात समाजात रूढ होती. स्त्री ही पुरुषांपेक्षा कनिष्ठ आहे. तिचे कार्य चुल आणि मूल एवढयापुरतेच मर्यादित आहे असे मानले जात होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता.त्यांनी शिक्षण घेतल्यास त्या आणि शिक्षण सुध्दा भ्रष्ट होते. अशी कल्पना समाजात रूढ होती. हे सर्व बदलले पाहिजे अशी भूमिका महात्मा फूलेंनी घेतली. त्याकाळात जरठ विवाह प्रचलित होता त्यामुळे बालविधवांची संख्या वाढत होती. विधवांनी केशवपन केले पाहिजे अशी सक्ती होती. त्यांना अशुभ मानले जात असे. समारंभात सहभागी होण्यावर त्यांच्यावर बंधने लादण्यात आली होती. यामुळे त्यांच्यावर अंधारात बसुन जीवन जगण्याची पाळी आली होती. विधवा स्त्रीला कोणी फसविले, तिच्या असहाय्यतेचा फायदा घेतला किंवा एखादयावेळेस तिचे पाऊल वाकडे पडले तर त्यासाठी ती व्यक्ती जबाबदार आहे असे समजून तिला कठोर शिक्षा दिली जात असे. विधवा स्त्रियांना फसविणारे पुरूष सही सलामत सुटून जात असत. समाजातील स्त्रियांच्या दु:खाचे निवारण करण्याचे कार्य केले. हे कार्य करीत असतांना त्यांनी सर्व जातीतील सर्व स्त्रियांचा विचार केला.

महात्मा फूलेंच्या टिकात्मक परिक्षणात स्त्री समस्या महत्वाचा मुद्दा होता. कुप्रथांना शह देण्यासाठी फूल्यांनी स्त्रिया व तळागाळातील लोकांच्या शिक्षणावर भर दिला. ऑमवेट यांच्या मते स्त्री–पुरुष विशमता जातीच्या उत्तरंडीशी जोडून स्त्रियांचा प्रश्न एकूण परिवर्तनाचा अंगभूत मानण्याचे होय. महात्मा फूले यांचे मत आहे. पुनर्विवाहाची परवानगी नसलेल्या, फसवणुकीतून होणाऱ्या संततीच्या हत्या रोखण्यासाठी 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना करून स्वतः अनौरस मुलगा दत्तक घेऊन फूल्यांनी हा प्रश्न स्त्रियांच्या अनैतिकतेचा नसून लैंगिकतेवरील संरचनात्मक नियंत्रणाचा आहे हे स्पष्ट केले. विधुत भागवत यांच्या मते स्त्रियांचे दास्यत्व भारतीय समाजातील दारिद्रय व अवनीती याकडे फूले यांनी समग्र दृष्टिकोनातून पाहिले.

महात्मा ज्योतिबा फूले म्हणतात की, माझ्याकरीता नेहमी दुःखाचे

कारण म्हणजेच स्त्री समाज राहिला आहे कारण समाजाने त्यांना समाजाचे पृथ्थक एकक मानले. तिला केवळ कुटुंबाचे घटक मानले. अनादिकाळापासून शोशण, अत्याचार, उत्पीडा स्त्रिलाच कां? आज महिला अत्याचार हिंसेचे प्रमाण वाढतच आहे. स्त्रिशी जुडलेला कुप्रथा, तत्वज्ञ, चिंतक, समाज सुधारकांकरीता आव्हान आहे. परंपरावादी समाज, रूढीबंधता, धार्मिक कट्टरता, समाजातील कुप्रथा दुर करण्यास पहाडाची भूमिका केली आहे. उच्च समजल्या जाणाऱ्या समाजांनी नेहमीच स्त्रीसुधार कार्यात अडथळे निर्माण केले. त्यांची इच्छा समाजातून सतीप्रथा, विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षणाचा प्रसार, बालविवाह बंद झाल्या पाहिजे या बद्दल ते सहमत नव्हते. वेळ आणि परिस्थिती यांनी चिंतक, समाज सुधारक,तत्वज्ञ, तत्ववेत्ता निर्माण केले. पुर्नजागरण कालखंडात समाज सुधारकांनी स्त्री समस्या निराकरण करण्यास बहुमूल्य योगदान दिले. भारतीय जाती व्यवस्था, वर्णव्यवस्था, धार्मिक रूढीवादीता यामुळे वर्ण, जाती व्यवस्थेतून व्यक्तिंमध्ये विशमतेची लक्ष्मण रेषा ओढली. इतकेच नाही तर राजनितिक व्यवस्था, सत्तानिती यामुळे ते अजुन मजबूत झाले. सामंतवादी व्यवस्थानी निम्न जातींतील लोकांचे शोषण केले. तत्कालिन समाजात भारतीय नवजागरण आणि स्त्री सशक्तीकरण एक चळवळीच्या स्वरूपात उदयास आली. धर्माच्या नावावर धार्मिक शिक्षणाचे उपदेश, कर्मकांडाच्या बंधनात स्त्रीला पुरूषांच्या अधीन ठेवले गेले. त्यांच्या सोबत अमानवीय व्यवहार केले गेले. सामंतवादी, पितृसत्ताक व्यवस्थेच्या विरोधात महात्मा ज्योतिबा फूले यांनी चळवळ उभारली. त्यामुळे स्त्री चेतना जागष्त होऊन स्त्री सक्षमीकरण आणि स्वावलंबी बनविली तर नवजागरण चळवळीने स्त्री जगतातील विविध समस्यांचे निराकरण करून नव ऊर्जा निर्माण केली, प्रगती केली, प्रेरणा दिली. नवजागरण चळवळीतील महत्वपूर्ण तथ्य म्हणजे सर्व कालखंडातील नवजागृत चळवळीचे माध्यम धर्म होते. धर्म समाजाला संघटित, नियंत्रीत करण्याचे साधन होते. यालाही साधन मानून स्त्रीला घराच्या चार भिंतीत बंदिस्त बनवून ठेवले गेले. संपूर्ण कौटुंबिक उत्तरदायित्व धर्माच्या, आदर्शाच्या आधारे लादले गेले. सती जाण्यासारखे अपराध धर्माच्या नावावर केले जायचे. आपल्या युगाच्या आव्हानांना स्विकारून परिणामतः निर्मित होत म्हणून त्या संपूर्ण युगाच्या संघर्षाची अभिव्यक्ति बघायला मिळते. मूल्यांची अभिव्यक्ति मानवाच्या व्यवहार, विचारातून प्रदर्शित होते. स्त्री जागृकता ही चळवळ, संघर्ष हा आंतर आणि बाहय होता. देशांतर्गत आणि विदेशातही हया संघर्षांनी खऱ्या विकासाची प्रक्रिया निवडली. या नवनिर्मिती जागरणात भारतीयांचा ऐतिहासिक पैलू आहे. त्या दोन प्रक्रिया सामन्त संस्कृती आणि भारतीयकरण–सामन्ती संस्कृती शोषण–अत्याचार–उत्पीडांचा समावेश होता. निष्ठा आणि मूल्य शून्यात त्यांची चेतना समाविष्ट विकासाची श्रृंखला प्रगतीच्या दिशेत निरंतर गतिशील होती. समानता, सामाजिक न्याय आणि संविधानात दिले गेलेले स्त्री अधिकार, नारी जगतात स्त्रीला सशक्त बनविण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. महात्मा ज्योतिबा फूले यांनी स्त्री चेतना, स्त्री अस्मितांचा बोध करवित स्त्रीला तिची ओळख बनविण्याची प्रेरणा दिली. स्त्रीचे अस्तित्व बनविण्यात कठोर संघर्ष करावा लागत होता. स्त्री आपल्या अहिताकरीता स्वतः चेतनाशील होऊ लागली. आधुनिक, शिक्षीत, प्रगतीशील स्त्री, धार्मिक अंधविश्वास, परंपरा, रूढीचे खंडन करत आहे. भारतीय संस्कृतीत धर्म, परंपरा, नैतिकता, आदर्श, मान्यतांचे आपले वेगळे महत्व आहे ही संस्कृतीची ओळख आहे. जेव्हा संस्कृतीचे तत्व रूढी बनतात तेव्हा ते समाजाकरीता नाहीतर स्त्री करीताही घातक बनतात. धर्माच्या अंधविश्वास मूल्य आणि मान्यतांनी स्त्रीला कधी पुढे येऊ दिले नाही. नवचेतनेच्या विविध परिप्रेक्ष्य, आयामातून स्त्रीचेतनेला शक्ती प्राप्त झाली. यामुळे धार्मिक, सामाजिक कुप्रथां विरूध्द आवाजच काढला नाही तर विरोधही दर्शविला. निश्चितच विसाव्या शतकात स्त्रीचेतना जुन्या धार्मिक–सामाजिक मान्यतांची उपेक्षा करायला सुरुवात केली. अंधविश्वासाच्या बंधनातून मूक्त होत आहे.

कन्हैय्यालाल चंचरीक लिहितात की, महात्मा ज्योतिबा फूल्यांनी शिक्षण कालखंडात स्त्रीशिक्षणाच्या कमतरतेची जाणीव झाली. त्यांना माहित होते की, छत्रपती शिवाजी महाराजांना योध्दा, आधुनिक भारताचे महान साम्राज्याचा निर्माता बनविण्यात त्यांच्या आईची अहम भूमिका होती. त्यांनी समजून घेतले की, भावी पिढीच्या निर्माणाकरीता स्त्री शिक्षण महत्वपूर्ण आहे. दलित स्त्रीला शिक्षणाचा अभिनव प्रयोग स्वतःमध्ये एक विस्मयकारी, क्रांतिकारी विचार होता.

भाऊसाहेब यांनी 17 फेब्रुवारी 1852 मध्ये स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रातील केलेल्या कार्याची प्रशंसा केली. 5 डिसेंबर 1853 ला 'ज्ञान प्रकाश' मराठी पत्रात आपल्या शुद्र बांधवांना अज्ञानतेच्या सागरातून बाहेर काढुन ज्ञानरूपी अमृताचे पान करविण्याचे प्रयत्न ज्योतिबांनी केले. त्यामुळे त्यांच्यावर अनेक संकट आले. त्यांनी आपदांचा सामना केला. दलितांमध्ये 'ज्ञानचेतना चळवळ' त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत असे सांगितले. शिक्षण विकासात लोकांना साक्षर बनविण्यात, ज्ञान ज्योति देण्यात ते जे कार्य करित होते ते कार्य पुढे निरंतर वाढत गेले.

स्त्रीवादी लेखिका डॉ. पदमा पाटील लिहितात की, इंग्रजी शिक्षण घेऊन जितके प्रगल्भ झाले की, विद्रोही, तात्कालीन प्रस्थापित, सनातन, पाखंडी, पुरोहितवादींच्या कट्टर विरोधीच्या नावाने प्रसिध्द झाले. हाथ टाइम्स, पेनकृत, 'राईट ऑफ मन' ग्रंथाच्या वाचन, चिंतन, मनन, केल्यानंतर अन्त:बाहदय विचारक, चिंतकाच्या स्वरूपात परिवर्तीत झाले. सवर्णांनी निम्न जातीचा केलेला अपमान, अस्पृश्यता पालन, निर्दयतापूर्ण आचरण, विद्वान, उच्चवर्णीयांचे अभिमान अधिकाधिक सक्रिय आणि सतर्क बनवित गेले. कुटुंबातील एक स्त्री शिकली तर एक कारागृह बंद होणार असे म्हणून त्यांनी स्त्रीशिक्षणाचा जोर धरला. महात्मा फूले यांनीही एक असा संकल्प केला.

ज्योतिबा फूले यांनी नेहमीच संकीर्णतेतून उत्पन्न धार्मिक अंधविश्वासाचे खंण्डन केले. त्यांनी स्त्री शिक्षण, समानता, विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले तर बालविवाहाचा विरोध दर्शविला. याप्रयत्नातून स्त्रीमुक्ती इतिहासाचा एक नवीन इतिहास रचित केला गेला. ज्यांचा स्पष्ट उद्देश्य सुधारणावादी प्रगतीशील होता. त्यांच्याद्वारा कार्यान्वीत आश्रम, स्त्रीआत्मसन्मान आणि स्त्री कार्याच्या प्रती निष्ठेचे द्योतक आहे. त्यांच्या कार्यातून परंपरागत रूढीवादीता शिथिल होत गेल्या. नवनवीन जीवनदर्शन निर्माण झाले. राजकीय, धार्मिक, बौद्धिक, कलात्मक राष्ट्रीयता याप्रमाणे तो बौध्दिक नवजागरणाचा कालखंण्ड झाला.

15 ऑगष्ट 1947 नंतर एक नवीन सुर्य भारतीय स्त्रीयांकरीता जीवनात एक नवीन प्रकाश घेऊन आला. स्वातंत्र्यानंतर महानगर, नगरात,स्त्रीयांनी प्रत्येक क्षेत्रात पदार्पण केले. उच्च व तांत्रिक शिक्षण प्राप्त करून मोठया पदाधिकारी झाल्या आहेत. स्त्री मध्ये स्वावलंबी आणि नवऊर्जासह चेतना जागृत झाली आहे. स्त्री सैन्यातही अधिकारी आहेत. यासर्व वास्तविक चित्रणानंतर स्त्री यशस्वीतेच्या शिडया चढत जात आहे, हे अतिशय प्रशंसनीय आहे.

मानवाची 'जययात्रा' प्रगतीच्या दिशेने निरन्तर गतीशील आहे. निश्चितच एकविसव्या शतकात स्त्रीसबलीकरण चळवळ महत्वपूर्ण बाजु आहे. आज स्त्रीचे वाढते पाऊल आकाशापर्यंत पोहचले. नाहीतर विश्वात अत्याधिक लोकसंख्या असलेला देश भारताची राष्ट्रपती एक महिला झाली. समानता, सामाजिक न्याय आणि संविधानानी दिलेले स्त्रीला अधिकार स्त्रीविश्वाला साक्त बनविते तर ही प्रक्रिया देशात सुरु झाली आहे.

1. ज्याप्रमाणे रेडिकल स्त्रीवादी पितृसत्ताक वर्चस्वाच्या विरोधात विरोध दर्शवितात. लिंगभेदावरील आधारीत स्त्री–पुरूष भेदभाव यांना मान्य नाही त्याप्रमाणे तत्कालीन समाजात महात्मा ज्योतिबा फूले यांनी ताराबाई शिंदे यांच्या विचारसरणीला दुजोरा देत ''स्त्री–पुरूष समानता'' चे बीज समाजात रूजविले होते.

2 उदारवादी विचारधारेंचा विज्ञान सत्याला सिध्द करते. मानवतावादी दृष्टीने विचार करण्यास प्रारंभ झाला. चेतनेचे नवीन पर्व सुरू झाले. स्वतंत्रता, समानता, बंधुता यातून मानवतावादी चेतना निर्माण झाली. या तत्वप्रणालीनुसार समाजात स्त्रीला सन्मानपूर्वक दर्जा देण्यास सुरुवात झाली. महात्मा ज्योतिबा फूलेंनी ही स्त्री आणि दलित स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात अविस्मरणीय कार्य केले. आज एकेविसाव्या शतकात पुरूषांचे स्त्रीवरचे वर्चस्व कमी झाले आहे. स्त्रीवर पितृसत्ताक दबावतंत्र, प्रताडित केले जात होते. आज नगर, महानगरात शिक्षित कुटुंबातही हे प्रमाण कमी होतांना दिसत आहे. पत्नी करीता पतीचे विचार,मानसिकतेत परिवर्तन आले आहे. हे उदारवादी दृष्टिकोनासह महात्मा ज्योतिबा फूलेंच्या कार्याचा परिपाक आहे.

3 आधुनिक समाजात लिंग भेदाभावाची संकल्पना समाप्त होतांना दिसत आहे. आधुनिक स्त्री आज दुसऱ्या ग्रहांवर जाऊन पोहोचली आहे. विमानात पायलट, सैन्यात अधिकारी, राज्यव्यवस्थेत प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, राष्ट्रपती झाली आहे. आजपण तीच पितृसत्ताक समाज संरचना आहे. ज्यात स्त्रीयांना पुरूषांच्या अधीन राहावे लागत होते. आज शिक्षण, विज्ञान, प्रौद्योगिकी या क्षेत्रात प्रगती झाल्याने संरचनेचा प्रकार्यात्मक आराखडाच बदलला आहे. स्पष्ट आहे की, लिंगभेदभावपूर्ण संकल्पना मागे पडली आहे. तत्कालीन समाजात पितृसत्ताक लिंगभेदभावपूर्ण वातावरण होते, यावर प्रघात करत महात्मा ज्योतिबा फूले यांनी पितृसत्ताक संरचनेत परिवर्तन करण्याचा प्रयास केला होता. त्याचीच ही परिणीती होय.

4 मार्क्सवादी स्त्रीवादात उत्पादनाच्या साधनात जसे–जसे व्यक्तिंचा एकाधिकार वाढतो तसे–तसे श्रमिक वर्गाचे शोषण वाढत जाते. या शोषणात स्त्री ही संम्मीलीत होती. वैयक्तिक संपत्ती मध्ये वृध्दीबरोबरच स्त्री ही पुरूषांची संपत्ती झाली. स्वतंत्रता, अधिकार तिच्याकडे नव्हते. स्त्रीशोषणाची पकड आर्थिक संरचनेवर मानवाच्या एकाधिकाराला जन्म देते. औद्योगिकरणा बरोबरच स्त्री समस्यांची तीव्रता वाढत गेली. महात्मा ज्योतिबा फूले यांनीही स्त्री गृहाची शोभा नसून एक समाजातील महत्वपूर्ण घटक आहे असे सांगितले. आज आर्थिक शक्ति पूंजीवादी व्यवस्थेतून मूक्त होऊ पाहते. स्त्रीच्या आर्थिक, सामाजिक स्थितीमध्ये सकारात्मक परिवर्तन आले आहे. आर्थिक निर्णयवाद सिध्दांताला अनुकूल वैज्ञानिक विश्लेषण हे ज्योतिबांच्या कार्याचे प्रतिफळ आहे. स्त्री एकविसाव्या शतकात आधुनिक, अत्याधुनिक, प्रगतिशील समाजातील व्यक्तिंना काही प्रश्नांचे उत्तर महात्मा फूलेंच्या पुरोगामी महाराष्ट्रातील प्रगतीशील, तर्कनिष्ठ दृष्टिकोन ठेवणाऱ्या मानवी समाजाला स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून प्रगट करू इच्छिते.

अ) स्त्रीचे अपहरण कां केले जाते? ब) हुंडयाच्या नावावर आजही स्त्रीला कां जाळले जाते? क) स्त्रीसोबत बलात्कार आणि सामुहिक बलात्कार कां केले जातात? ड) स्त्रीला संवेंगात्मक प्रताडित कां केले जाते? इ) कुटुंबात संवेंदना अधिकाराचे कां हनन केले जाते? ई) कुटुंबातील लोक आजही स्त्रीला Unpaid ervant म्हणून कां वागणूक देतात? उ) कन्या भ्रूणहत्या का केली जाते?

**निष्कर्श :–**

एकविसाव्या शतकात स्त्रीशोषण, प्रताडनेचे परिदृश्य, पुरूषी मानसिकता ठेवणाऱ्या समाजात सामाजिक न्याय आणि समानतेची मागणी करते. सत्य तर हे आहे की, निम्न वर्गापासून उच्चभ्रू समाजात आजही विविध स्वरूपाने स्त्रीचे शोषण होत आहे. संवैधानिक आणि कायदयांन्वये ती पुरूषांच्या समकक्ष जरी उभी दिसत असली तरी चित्र वेगळेच आहे. गरज आहे व्यक्तिच्या विचार आणि मानसिकतेत बदल करण्याची. स्त्रीला सहयोगी, स्त्रीशक्तिच्या स्वरूपात स्विकार करण्याची तेव्हाच खऱ्या अर्थाने क्रांतिसुर्य महात्मा ज्योतिबा फूलेंच्या कार्याला, कष्टाला, परिश्रमाला, समाजसुधारणेच्या चळवळीला मानवंदना होईल.

***संदर्भग्रंथ :–***

1) *नारीवाद :– वी.एन.सिंह, जयमेजय सिंह, रावत पब्लिकेशन, नवी दिल्ली.*
2) *Key Concepts in Feminist Theory and Research, Christina Hughe, Sage Publications, New Delhi.*
3) *Menol, Nivedita 2012, seeing like a feminist New Delhi.*
4) *Feminism is for everybody, passionate politics bell hooks, South End Press, Cambridge.*
5) *https://archive.org/details/woolf_aroom/page/112/mode/2up.*
6) *https://93, 17495.29/_ads/F2FEC 17274BuDDB 72599A2DBEBCBA977*
7) *स्त्रीवादी पध्दतीशास्त्र – विद्युत भागवत.*
8) *कायदयाचा भूप्रदेश स्त्रीवादी भिंगातून.*
9) *स्त्री प्रश्नांची वाटचाल – विद्युत भागवत, 2004, प्रतिमा प्रकाशन, पूणे.*